**प्रेसनोट** दि.२९/११/२०२४

## पायधुनी, मुंबई परिसरात खंडणी विरोधी कक्ष यांनी अग्निशस्त्रे व जिवंत काडतुसे यांचा साठा जप्त केलेबाबत

खंडणी विरोधी कक्ष, मुंबई येथे कार्यरत असलेले पो.ह.क्र. पो.ह.क्र. ०४१२००/ अमोल रामचंद्र तोडकर यांना विश्वनिय सुत्राकडून माहिती प्राप्त झाली की, काही संशयीत इसम विनापरवाना बेकायदेशीरपणे अग्निशस्त्रे व जिवंत काडतुसे घेवुन ते विक्री करण्याच्या उद्देशाने दिनांक २८/११/२०२४ रोजी रात्रौ प्रभु हॉटेल समोरची लेन, पी. डीमेलो रोड, पायधुनी, मुंबई येथे येणार आहेत. सदर माहितीची खंडणी विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांनी शहानिशा करून, अधिकारी व अंमलदार यांनी नमुद ठिकाणी सापळा रचुन **तीन इसमांना** त्यांच्या ताब्यातील **दोन पिस्टल, एक रिव्हॉलवर, तीन गावठी बनावटीचे सिंगल बोअर कट्टे, दोन रिकाम्या मॅगझीन आणि एकुण ६७ जिवंत काडतुसे** इत्यादी मालमत्तेसह रंगेहात पकडण्यात आले. सदर बाबत पायधुनी पोलीस ठाणे, मुंबई या ठिकाणी गुन्हा दाखल करुन पुढील तपास खंडणी विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांचे मार्फत करण्यात येत आहे.

अटक करण्यात आलेल्या इसमांची नावे १) अभिषेककुमार अंजनीकुमार पटेल, वय २६ वर्षे, २) सिध्दार्थ सुबोधकुमार सुमन उर्फ गोलु, वय २३ वर्षे , ३) रचित रामशिषकुमार मंडल उर्फ पुष्पक, वय २७ वर्षे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त, मुंबई श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शशी कुमार मीना, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) दत्ता नलावडे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, डी (विशेष) श्री. किशोरकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकातील प्र.पो.नि. सुधीर जाधव, पो.नि. सुनिल पवार, अरुण थोरात, स.पो.नि. मारुती कदम, जालिंद्र लेंभे, मालमत्ता कक्षाचे स.पो.नि. संतोष पवार, स.फौ.क्र.३२३०४/संदीप ब्रिद, पो. ह.क्र. ३३१२८/संतोष सुर्वे, पो.ह.क्र. ९६१२६०/विजय थोरात, पो.ह.क्र. ०३.३९५/निलेश कंद, पो.ह.क्र. ०३१२५/ मुळे, पो.ह.क्र. ०४०६६६/ रोहन सुर्वे, पो.ह.क्र. ०४१२००/तोडकर, पो.ह.क्र. ०४११९/धादवड, पो.शि.क्र.०८००५१/ राजाराम मोटे, पो.शि.चा.क्र. २१६८५५/जमील शेख, पो.शि.क्र. २१६९३४/कोळी, पो.ह.क्र. ०९२२८/सुशिल साळुंखे व विशेष पथकातील पो.ह.क्र. ०१२९०/हरिष दलाल, पो.ह.क्र. ०५०२१९/शेखर पाटील, पो.ह.चा.क्र. ०९०२६२७/रवी राठोड, पो.शि.क्र. ११०९००/संतोष वायाळ, पो.शि.क्र. १४०३०६/ उत्कृष्ठ कदम यांनी पार पाडलेली आहे.

.....................